International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.2 Nov – Dec 2021

# शिवाजीराव नागवडे यांचे शेती प्रश्नासाठी लढा : एक अभ्यास

**प्रा. शिवाजी रावसाहेब नेटके**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा

**प्रस्तावना:**

शिवाजीराव नागवडे यांचा जन्म रुईगव्हाण या गावी १९ जानेवारी १९३४ रोजी झाला. वडिलोपार्जित शेती पिकवणे व उपजीविका करणे हे नित्याचे होते. वडिलोपार्जित शेती असल्याने सर्व शेतीच्या कामात मदत करत असत.शिवाजीराव नागवडे यांचे बालपण गेले. शिवाजीराव नागवडे यांचा जन्म एका शेतकरी घराण्यात झाला.शेतीची अवस्था खूप वाईट होती. सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतीची वाईट अवस्था झाली होती. शेतीतून उपजीविका होईल एवढे पिकवणे मुश्कील झाले होतेतत्कालीन परिस्थिती बिकट असल्याने बापूंची जडणघडण परिस्थितीस अनुरूप झाली. नागवडे कुटुंबाचा वंशपरंपरागत शेती व्यवसाय होता. एकत्रित कुटुंबपद्धती असल्यामुळे सहचर्याने कामे होत असत वडिलोपार्जित पिढीजात शेती व पाण्याअभावी होणारी परवड बापूंनी लहान वयात पहिली होती. वडिलांबरोबर शेतात जाणे त्यांना कामात मदत करणे, औत, काठी हाकण्यात बापू मदत करत. १९५२ चा भयावह दुष्काळाचा बापूंवरती खूप परिणाम झाला. या दुष्काळातील लोकांची व जनावरांची अन्न पाण्यावाचून परवड बापूंनी पहिली होती.आपण यासाठी काहीतरी करावे ही जाणीव त्यांना निर्माण झाली व पहिल्यांदा पाण्याच्या प्रश्नावर संघर्ष करायचा हा निश्चय केला.

**कुकडी पाणी परिषद : १९५२**

अहमदनगर जिल्ह्याचा दक्षिण भाग हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जात होता पाण्याविना शेती करणे व उपजीविका भागवणे अवघड होते. निसर्गाच्या लहरीपणामुळे श्रीगोंदा कोरडवाहू होता. शिवाजीराव नागवडे उर्फ बापूंनी शेतीला पाणी उपलब्ध व्हावे म्हणून श्रीगोंदयातपहिली भव्य पाणी परिषद घेतली होती. श्रीगोंदा परिसरातील जिरायत भागातील मोडून पडलेला माणुस उभा करण्यासाठी सन १९५२ साली विशाल कुकडी पाणी परिषद भरवली व श्रीगोंदयाच्या विकासाचे पाहिले पाऊल टाकले.

एखादे सार्वजनिक काम करावयाचे हे आधी मनाशी ठामपणे ठरवायचे. मग कितीही अडचणी येवोत, जिद्दीने व चिकाटीने पार पाडायचे, हा बापूंचा स्वभाव आहे त्याचा प्रत्यय त्याच्या अनेक कामांवरून येतो. इंग्रजी राजवटीत १८८५ मध्ये विशाल कुकडी योजनेची मोजणी झाली होती. बिल नावाचा इंग्रज इंजिनीअर व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी हे काम केले होते.त्यावेळेचा नकाशा पाहिला असता योजनेत आंबेगाव, खेड, मंचर, वेल्हा, शिरूर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, करमाळा या भागाचा समावेश होता. कालव्याची लांबी २८० कि.मी. पर्यंत होती. या योजनेत १९८० नंतर बदल होऊन ती कार्यान्वित झाली. कालव्यावी लांबी २६५ कि.मी. आहे. हा कालवा कडुस, भोयरा खिंडीतून रांजगाव मशीद, उख्खलगाव, सुरेगाव, भानगाव, टाकळी लोणारच्या डोंगरकपारीने गेला असता, तर त्याची लांबी १० ते १५ कि.मी.ने वाढली असती. या योजनेला चालना देण्यासाठी शिवाजीराव नागवडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी खूपपरिश्रम घेतले. १९५७-५८ या वर्षी बापूसाहेब भापकर,शिवाजीराव नागवडे यांनी पुढाकार घेऊन अधीक्षक अभियंता मायदेव व कार्यकारी अभियंता चाफेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी केली. त्यानुसारच ती मंजूर झाली शिवाजीराव नागवडे यांच्या पुढाकाराने १९६७ मध्ये विशाल कुकडी योजनेचे भूमिपूजन तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झालेया कामाला गती देण्यासाठी १९७६ मध्ये विसापूर येथे विजयसिंह मोहिते पाटील, दादापाटील शेळके, आठरे पाटील यांच्या उपस्थितीत परिषद घेण्यात आली.१९८० मध्ये कुकडीच्या पाण्याचे राजकारण सुरू झाले. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना कुकडीचे पाणी विसापूर तलावात सोडण्यात आले. तेथून पुढील तालुक्यात ते पाणी न्यायचे होते, पण नंतर फार मोठा खर्च करून हंगा सेतू बांधण्यात आला१९७७ मध्ये आमदार असताना शिवाजीराव नागवडे यांनी विशाल कुकडीचा पाठपुरावा केला.[२]

**घोड - कुकडी पाणीप्रश्न :१) मोरारजी देसाई घोड प्रकल्प भूमिपूजन :**

घोड नदीचा उगम पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील उतारावर समुद्रसपाटीपासून १०९० मीटर वर होतो. भीमाच्या संगमापूर्वी ती पूर्वआग्नेय दिशेने अंदाजे २००किलोमीटर (१२० मैल) वाहते. सह्याद्री पर्वताच्या उत्तरेकडून वाहते.

अहमदनगर जिल्ह्याचा दक्षिणेकडचा भाग कायम दुष्काळी असायचा या भागाला थोडा दिलासा मिळाला तो घोड पाटबंधारे प्रकल्प निर्माण झाल्यामुळे. श्रीगोंदे तालुक्यातील मढेवडगाव चिंचणी घोड प्रकल्पाचे

भूमिपूजन १७ जानेवारी १९५४ रोजी सकाळी ९.३० वाजता झाले होते. घोड प्रकल्पाचे भूमिपूजनासाठी मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाईआले होते.

मोरारजी देसाई जेव्हा शासकीय सेवेत उपजिल्हाधिकारी होते, तेव्हा हरिश्चंद्रगडावर दौऱ्यावर आले होते. तसेच भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे सन १९५३ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी दौऱ्याची पाहणी करण्यास आले होते. त्यावेळेस ते नगरच्या भुईकोट किल्ल्याला भेट देण्यासाठी आले होते. तेव्हा त्यांच्या समवेत मोरारजी देसाई होते. येथील दुष्काळाची तीव्रता पाहूनपरीस्थिती किती भयाण आहे. याची जाणीव त्यांना झाली. परिणामी १९५४ मध्ये त्यांनी घोड प्रकल्पाचे भूमिपूजन करून प्रकल्पाचे काम सुरू केले होते.

घोड धरण मढेवडगाव (चिंचणीगाव) या परिसरात प्रस्तावित केले.घोड प्रकल्पाला १२ जुलै १९५४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. घोड धरणाचे बांधकाम सन १९५४ मध्ये सुरू झालेआणि सन १९५८ मध्ये पूर्ण झाले. परंतु कालवे सन १९६५ मध्ये पूर्ण झाले होते. धरणाचे काम खूप गतीने व जलद पूर्ण करण्यात आले होते. त्यामुळे बुडीत जमिनीचे सर्वेक्षण पूर्ण झाले नव्हते धरणात पाणी जेव्हा पूर्णपणे साठवले गेले, तेव्हा अनेक जमिनी बाधित झाल्या होत्या. ती एक मोठी आपत्ती निर्माण झाली होती.

घोड प्रकल्पात चिंचणी धरणाचा साठा असून त्याची क्षमता ५.४७ टीएमसी आहे. घोड नदीवर धरण बांधून घोड जलाशयाची निर्मिती झाली घोड धरण, मूळचे पावा धरण, हे एक मातीचे धरण आहे. त्या दुष्काळी प्रदेशातील शेतजमिनीला सिंचन देण्यासाठी आणि ते अधिक उत्पादक बनवण्यासाठी धरणाची रचना आणि बांधणी करण्यात आली होती.धरणाची उंची २९.६ मीटर तर लांबी ३३०० मीटर आहे. धरणाचे मातीकाम १.०२०दशलक्ष घनमीटर आहे. पाणी साठवण क्षमता २१६.३दशलक्ष घन मीटर आहे. जलाशयाची उपयुक्त पाणीसाठा १५४.८ दशलक्ष घनमीटर आणि पृष्ठभागाचे क्षेत्रफळ ३०.९९२दशलक्ष वर्ग मीटर आहे.हे धरण शिरूर, श्रीगोंदा आणि कर्जत तालुक्यातील २०५०० हेक्टर टंचाई क्षेत्राला सिंचनाचा लाभ देते यापैकी १०००हेक्टर बारमाही सिंचन आहे. प्रकल्पात २कालवे आहेत.कमाल पाणी पातळी ५५१.६९ मीटर आहे. तर पूर्ण जलाशय पातळी ५४८.६४ मीटर आहे.सध्या १.२८लाख लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी घोड धरणावर अवलंबून आहे. १०.४०टीएमसी पाणी वापरापैकी ९.७८सिंचनासाठी, ०.३० पिण्यासाठी आणि०.३२औद्योगिक वापरासाठी वापरले जाते.

घोड व कुकडी धरणाच्या उभारणीसाठी व जिरायत भागाला पाणी मिळवून देण्यासाठी वेळोवेळी पाटपाणी परिषदा घेवून, मोर्चे काढुन व शासन दरबारी पाठपुरावा करुन तालुक्यातील शेतीला पाणी मिळवून देण्यात बापूंनी यशस्वी पाठपुरावा केला कुकडी धरणातील पाणी विसापुर धरणांत सोडणेकरीता १६ कि.मी. कालव्याचे काम करून घेतले व डॉ. शिवाजीराव निलंगेकर (माजी मुख्यमंत्री) व तत्कालीन मंत्री मा.श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांचेकडून विशेष मान्यता मिळवून पाणी विसापुर धरणांत सोडले घोड धरणातील पाणी जास्तीत जास्त लाभधारकांना मिळावे व सिंचन क्षेत्र वाढावे याकरीता बारमाहीपाणी वाटप धोरणाची तरतुद शिवाजीराव नागवडे तथा बापूंनी करुन घेतली.

**भोसे खिंड :**

तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करुन व विशेष बाब म्हणुन मंजूरी मिळवून कृष्णा खोरे विकास महामंडळातर्गत असणाऱ्या१८.१५ कि.मी. लांबीचा व १०० कोटी रु. खर्चाची ऐतिहासिक भोसा खिंड ही योजना बापूंनी मंजूर करुन घेतलीव काम पुर्णत्वास नेण्यात यशस्वी झाले. या क्रांतीकारी योजनेमुळे३१ गावांतील ८५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले.

**पिण्याच्या पाण्याचा प्रश्न :**

शिवाजीराव नागवडे उर्फ बापूंनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सातत्याने पाठपुरावा करुन तालुक्यातील अनेक गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वीत करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केला. नदीकाठच्या गावांना शुध्द व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध होणेकरीता भारत निर्माण योजनेमधुन नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणेकरीता विशेष व यशस्वी प्रयत्न केले.

शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शेती कर्जावरील व्याज दर कमी करणेकरीता शेकडो शेतकऱ्यांसह रिझर्व बँक कार्यालय मुंबई येथे मोर्चा व निदर्शने केली. सन १९८३ मध्ये दिल्ली येथे झालेल्या किसान मेला कार्यक्रमात तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांसह सहभाग नोंदवला होता. श्रीगोंदा तालुक्यातील वंचीत शेतकऱ्यांना एकाच दिवशी ४५०० वीज कनेक्शन मिळवून देण्याचे ऐतिहासीक काम तत्कालीन ऊर्जामंत्री डॉ बळीराम हिरे यांचेकडून बापूंनी करून घेतले.

**निष्कर्ष :**

१) शिवाजीराव नागवडे यांनी शेतकऱ्यांचा प्रश्नासाठी मोठा संघर्ष केला.

२) शिवाजीराव नागवडे यांनी दिलेला पाण्याचा लढा आदर्श लोकचळवळीचे उदाहरण आहे.

३) शिवाजीराव नागवडे यांनी पाण्यासाठीच्या लढ्यामुळे श्रीगोंदा तालुका बागायती झाला.

**संदर्भसूची:**


१) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर,२००२.

२) घोडप्रकल्प पूजन कार्यक्रम पत्रिका, ११ जानेवारी १९५४

३) दैनिक महाराष्ट्र श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि. वार्षिक अहवाल, १९६५ – ६६

४) श्री छत्रपती बोठे बाळ ,शेतीविकासाठी लढणारा संघर्षशील नेता, दैनिक अग्रोवन,२१ सप्टेंबर२०१८.

५) शिवाजी महाविद्यालय, गोंदण अंक, श्रीगोंदा, २३ जानेवारी १९९९.

६) शेळकेदादा पाटील ,श्रीगोंद्याची प्रगती नागवडेमुळेच,दैनिक सार्वमत, २० जानेवारी २००८.

७) नंदकिशोर पाटील, दादा आता कुकडीच्या पाण्याचं काय,दैनिक लोकमत, २०जानेवारी २००८.

८) मोरेआबासाहेब,कुकडीचे शिल्पकार, मा.आमदार शिवाजी बापू नागवडे गौरव विशेषांक, ज्ञानदीप गौरव विशेषांक,श्रीगोंदा, २०१४

९) कॉम्रेड पंधरकर रंगनाथ, शेतकऱ्यांचे कैवारी, मा.आमदार शिवाजी बापू नागवडे गौरव विशेषांक, २०१४